# सरदार मलिक - भाग २



प्रश्न - आणि मग माँ आनंद माँ यांच्याबद्दल तुम्ही काय सांगाल ?

उत्तर - त्यांच्याबद्दलही माझे असेच मत आहे. मी त्यांच्या आश्रमात जवळजवळ १५ दिवस राहिलो. "तुझ्यासारख्या मुस्लिम माणसाला माझ्या आश्रमात यावेसे का वाटले ?" असे त्यांनी मला विचारले. मी त्यांच्याबरोबर इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलत असे. माझा एक प्रकाश नावाचा गायक मित्र होता. तो माझ्या अगदी जवळचा मित्र होता. मी त्याच्याविषयीही बोलत असे. त्या म्हणायच्या तुझे हृदय खरेच मोठे आहे. त्या आपल्या ताटातील अन्न मला मायेने देत. ह्या सर्वाचा परिणाम म्हणजे मी माझ्या घरापासून जवळजवळ ६ महिने दूर राहिलो.

प्रश्न - ही साधारण कधीची गोष्ट असावी ?

उत्तर - मी साधारण १६-१७ वर्षांचा होतो, म्हणजे बघा १९४५-४६ साल असावे. कुठल्याही धर्मनिरपेक्ष मी सदैव ज्ञानपिपासू होतो. मला कळतच नव्हते की एकाच धर्मातले लोक सुध्दा, एक गट ख्रिस्ताला मानतो तर दुसरा मेरीला मानतो यावरून भांडण का करतात ?

प्रश्न - म्हणजे तुमचा परंपरागत चालत आलेल्या धर्मावर विश्वास नाही असे म्हणायचे आहे का तुम्हाला?

उत्तर - हो, मला तसेच म्हणायचे आहे.

प्रश्न - मग तुम्ही नमाज पाळत नाही का ?

उत्तर - नाही. तो (अल्लाह) असेलही किंवा नसेलही. पण मोकळ्या मनाने मी विचार करू शकतो. माझे म्हणणे असे आहे की पूर्वग्रहदूषित मनाने विचार करण्यापेक्षा आपण एकमेकांचा सन्मान करून एकमेकांवर प्रेम करूया. माणुसकी या धर्मावरच माझा विश्वास आहे. परंतु काही बाबतीत माझ्याबद्दल गैरसमज होतात.

खरं तर प्रेम हा माझा सर्वांना संदेश आहे. विशेष करून आपण माणुसकी हा शब्द वापरूया. माझ्या मते प्रेमाच्या चार पायऱ्या आहेत. तुम्हाला जन्म देणाऱ्या, ह्या जगाची ओळख करून देणाऱ्या मात्यापित्यावर प्रेम करा. ही झाली प्रेमाची पहिली पायरी. त्यानंतर अन्नधान्य देऊन पालनपोषण करणाऱ्या देशावर प्रेम करा. तदनंतर सर्व प्रकारच्या सीमा विसरून सगळ्या मानवजातीवर प्रेम करा आणि सर्वात शेवटी, अगदी गरज असेल तरच तुमच्या जातीजमातीला विसरू नका. ह्या सगळ्या गोष्टी आवश्यक आहेत, परंतु सर्वांत श्रेष्ठ काय असे विचाराल तर मी म्हणेन, प्रेम आणि माणुसकी. जगात घडणाऱ्या वाईट गोष्टींचा, फक्त प्रेम आणि ममताच सामना करु शकतील. संगीतकार, शास्त्रज्ञ, डॉक्टर्स हे प्रेम आणि शांतीचे खरेखुरे संदेशक आहेत. सर्व जगाला आपलेसे करणारा रेशमी धागा म्हणजे संगीतच होय.

प्रश्न - आणि आता आम्हाला तुम्ही दिलेल्या संगीताबद्दल सांगा.

उत्तर - मी उत्तम संगीत देण्याचा प्रयत्न केला आणि साध्या, सरळ आणि सोप्या, सुरेल गाण्यांची निर्मिती केली.

प्रश्न - तुम्ही प्रथम गाणे मिळवून त्यावर स्वरसाज चढवत होता की ह्या उलटही होत होते ?

उत्तर - नाही. मी प्रथम गाणी स्वीकारीत असे.

प्रश्न - तुम्ही तरी जवळपास किती गाणी ध्वनिमुद्रित केली ?

उत्तर - मला नक्की आकडा आठवत नाही परंतु मी जवळजवळ २९/३० चित्रपट केले. सध्याचे प्रमाण पाहता हे म्हणजे काहीच नाही.

प्रश्न - आता तसे पाहिले तर चित्र बदलले आहे. पण आपण फक्त संख्या न पाहता गुणवत्तेचा पण विचार केला पाहिजे, नाही का ?

उत्तर - अर्थातच आणि जर कुणी मध्ये लुडबुड केली नसती तर ही संख्या नक्कीच वाढली असती. पण अशा अप्रिय गोष्टीबद्दल न बोललेलेच बरे असे मला वाटते.

(क्रमशः)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून.)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com